● मंगळवार, दि. १५ ऑक्टोबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ८४ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# प्रत्येक तालुक्यात एक हजार मराठा उद्योजक तयार करणार

## ना. नरेंद्र पाटील : जालना येथे मराठा महासंघ पदाधिकारी संवाद बैठकीत विविध विषयावर चर्चा



**जालना । प्रतिनिधी -** आरक्षणाबरोबरच सत्यधर्म, संस्कृतीचे पालन आणि राष्ट्रहिताच्या कार्यासाठी सदैव तत्पर राहणे, हाच क्षत्रिय मराठा धर्म आहे, अशी शिकवण मराठा हृदयसम्राट स्व. अण्णासाहेब पाटील यांनी आपणा सर्वांना दिलेली असून, ती विसरता कामा नये. धर्म टिकला तरच राष्ट्र प्रबळ बनेल. उद्योग व्यवसायात मराठ्यांचा सहभाग वाढावा, यासाठी आपण प्रयत्नशील असून, महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात एक हजार मराठा उद्योजक करण्याचे स्वप्न लवकरच पूर्णत्वाकडे जाईल, असा विश्वास मराठा महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष तथा स्व. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष ना. नरेंद्र पाटील यांनी येथे बोलताना व्यक्त केला.

जालना येथील अंबड चौफुलीवरील शासकीय विश्रामगृहात रविवार दि. १३ ऑक्टोबर रोजी आयोजित अखिल भारतीय मराठा महासंघाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या संवाद बैठकीत ना. नरेंद्र पाटील बोलत होते. अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख हे होते. यावेळी जिल्हा कार्याध्यक्ष अशोक पडूळ, जिल्हा उपाध्यक्ष सुभाष चव्हाण, ज्येष्ठ नेते संतोष जेधे, बबनराव गवारे, सरचिटणीस प्रा. संतोष कराळे, ड. युवक जिल्हाध्यक्ष शैलेश देशमुख आदींची प्रमुख उपस्थिती होती.

ना. पाटील पुढे म्हणाले की, मी कुणा पक्षात असलोतरी, अण्णासाहेबांचा पुत्र या नात्याने चळवळ अधिक महत्त्वाची आहे आणि मराठा समाजाच्या प्रत्येक कार्यक्रमात जाताना राजकीय विचारसरणीचे जोडे बाहेर ठेवूनच समाजहिताचे काम करत असतो. आजच्या तरुणांनी फक्त राजकारण डोक्यात घेण्यापेक्षा मराठा समाजाचे प्रलंबित प्रश्न समोपचाराने सोडवून घेण्यासाठी अभ्यासपूर्ण पाठपुरावा करावा व सत्यधर्म, संस्कृतीचे अगत्याने पालन करीत स्व. अण्णासाहेब साहेब पाटील यांनी सुरू केलेली पहिली मराठा चळवळ गतिमान करण्यासाठी नेहमी प्रयत्नशील राहावे. आपल्याकडे छत्रपती शिवाजी महाराज, स्व. अण्णासाहेब पाटील व विविध महापुरुषांचा आदर्श आहे, तो डोळ्यासमोर ठेवूनच कार्य करा. मी मराठा समाजाचा एक कार्यकर्ता म्हणून सदैव तुमच्या सोबत राहील, अशी ग्वाही ना. नरेंद्र पाटील यांनी दिली. यावेळी विविध विषयांवर विचारमंथन झाले.

अध्यक्षीय भाषणात अरविंद देशमुख म्हणाले की, सातत्यपूर्ण काम करणाऱ्या चळवळीतील कार्यकर्त्यांना बळ मिळाल्यास, काम चांगले वाढू शकते. अशांना प्राधान्य दिले जावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. ड. शैलेश देशमुख म्हणाले की, समाजातील अनेक युवक आता वकिली या क्षेत्रात उतरले आहेत. गरीबीतून ते वकील होतात. नवीन नियमानुसार वकिलीसाठी संगणक अथवा लॅपटॉप आवश्यक आहे. स्वतंत्र कपाटही लागते. सर्व कामे ऑनलाईन झाली आहेत. नव्याने वकिली क्षेत्रात पदार्पण करणाऱ्यांसमोर आर्थिक समस्या असते. बँका वकिलांना दारात उभे करत नाहीत. त्यामुळे हे साहित्य घेण्यासाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून अशा वकिलांना थेट कर्ज देण्यात यावे, अशी विनंती त्यांनी केली.

प्रारंभी मराठा महासंघाचे संस्थापक अध्यक्ष स्व. अण्णासाहेब पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून बैठकीला प्रारंभ झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अशोक पडूळ यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार सुभाष चव्हाण यांनी मानले.

या संवाद बैठकीला आकाश जगताप, विठ्ठल गवारे, बबन शेजुळ, बाळासाहेब देशमुख, कृष्णा यादव, कैलास सरकटे, कैलास ढमाळे, बाळकृष्ण उबाळे, प्रभाकर केदारे, सुनील कदम, अशोक जाधव, श्रीधर पोथरे, सुनील जोगदंड, मंगेश चव्हाण, ड. सुजित मोटे, उमेश सरकटे, गजानन सरकटे, शक्तीसिंग राजपूत, चंद्रकांत भोसले, मुकुंद बोटे, शुभम चव्हाण, अनिल चव्हाण, संतोष साबळे, सुरज गीते, अभिजीत देशमुख, संजय हिवाळे, विजय गुढेकर, बाळू बांगर आदी शेकडो कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

## विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीनिमित्त मुद्रणावर निर्बंध

**जालना । प्रतिनिधी -** आगामी महाराष्ट्र विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणूक- २०२४ चा कार्यक्रम भारत निवडणूक आयोगाकडून लवकरच जाहीर केला जाणार आहे. या निवडणुकीच्या अनुषंगाने पत्रके, भित्तीपत्रके आदि मुद्रणांचे संनियंत्रणासाठी जालना जिल्ह्यातील सर्व मुद्रणालयाचे लक्ष लोकप्रतिनिधीत्व कायदा १९५१ चे कलम १२७-क च्या आवश्यकतेकडे वेधण्यात येत आहे. अशी माहिती उपजिल्हा निवडणूक अधिकारी शशिकांत हदगल यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

कोणत्याही व्यक्तीला, निवडणूक पत्रक किंवा भित्तीपत्रकाच्या दर्शनी भागावर त्याच्या मुद्रकाचे आणि प्रकाशकाचे नाव व पत्ता नसेल असे कोणतेही मुद्रित वा प्रकाशित करता येणार नाही. निवडणुकीसाठी असणारी पत्रके, छापील साहित्य यावर प्रकाशक आणि मुद्रक यांची नावे असणे आवश्यक आहे. कोणत्याही व्यक्तीला निवडणूक पत्रक किंवा भित्तीपत्रक ती स्वतःच त्याचा प्रकाशक आहे या बद्दलचे त्याने स्वतः स्वाक्षरी केलेले व त्यावर दोन ओळखणाऱ्या व्यक्तींनी साक्षांकित केलेले अधिकथन मुद्रकास दिल्याशिवाय मुद्रकाने मुद्रण करू नये. दिलेल्या सुचनांप्रमाणे निवडणूक पत्रक किंवा भित्तीपत्रक प्रकाशित करणाऱ्या व्यक्तीने कार्यवाही केल्यावर आणि मुद्रकाने **पान २ वर**



## श्रेय घ्यायला लाज वाटत नाही का?

### मेडीकल कॉलेज; मुख्यमंत्र्यांचा काँग्रेसला टोला

जालना । प्रतिनिधी - येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या श्रेय घेण्यासाठी आ. कैलास गोरंट्याल हे प्रयत्न करत आहेत. शहरात जागोजागी कोटींचा खर्च करत त्यासाठी बॅनरबाजीही करण्यात आली आहे. यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घनसावंगी येथील एका कार्यक्रमात काँग्रेसला टोला लगावला आहे. काँग्रेस वाल्यांना मेडीकल कॉलेजचे श्रेय घ्यायला लाज वाटत नाही का? असा प्रश्न उपस्थित करत माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर **पान २ वर**

## रस्ता नव्हे मृत्यूचा सापळा; तात्काळ विद्युत खांबे हटवा

### अन्यथा जनआंदोलन; जालना कृति समितीचा इशारा



**जालना । प्रतिनिधी -** शहरातील रेल्वे स्टेशन ते चमन पर्यंतच्या रस्त्याचे काम अपुर्ण राहिले आहे. तसेच या रस्त्यावर मध्येच विद्युत खांब, विद्युत डीपी आल्याने हा रस्ता नव्हे तर मृत्यूचा सापळा झाला आहे. या रस्त्यावरुन मार्गक्रमण करतांना नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. या रस्त्यावरील विद्युत खांब, रोहित्र (डीपी) तात्काळ हटवावी व रस्त्याची दुरुस्ती करण्यात यावी अशी मागणी जालना कृति समितीच्यावतीने जिल्हाधिकारी यांच्याकडे करण्यात आली आहे. येत्या आठ दिवसात विद्युत खांब न हटल्यास मोठे जनआंदोलन उभारण्याचा ईशाराही कृति समितीच्यावतीने देण्यात आला आहे.

या संदर्भात दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, जालना शहरात रेल्वे स्टेशन ते चमन पर्यंतच्या रस्त्याचे काम अपुर्ण राहील्या कारणाने रोज विविध समस्यांना येथील नागरिकांना सामोरे जावे लागत आहे. यास सार्वजनिक बाधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता स्मिता पवार, अभियंता श्री. नागरे हे जवाबदार आहेत. त्यांच्यासह बांधकाम विभागाला नाहरकत प्रमाणपत्र देणारे महानगरपालिकेचे आयुक्त व संबंधीत अधिकारी हे देखील **पान २ वर**

युवा आदर्श

### कच्चे कैदी ...

**कच्चे कैदी समस्या**
**कायमची ग्रासलेली**
**रे प्रतिक्षेत न्यायाच्या**
**नीत सारी त्रासलेली**
**मूलभूत रे हक्कांची**
**नीत होई पायमल्ली**
**मल्लीनाथी करे सारे**
**जुनी खोल विषवल्ली**
**बोर्डावरती केस खरी**
**अजूनही नाही आली**
**मिळेना योग्य वकील**
**कुणीच नाही रे वाली**
**आरोप निश्चित होईना**
**शिक्षा तरीही भोगली**
**तुरुंगात सडण्याचीचं**
**सवय चांगली लागली**
**कोर्टात मारा हेलपाटे**
**तारीख मिळते पुढली**
**ऐन उमेदीची खरोखर**
**कितीतरी वर्षे सडली**
**असे निर्दोष कितीतरी**
**सदोष पध्दती नडली**
**दोषनसता भोगे शिक्षा**
**पिढी फुका बिघडली**

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## प्रियंका घुले हिचा सत्कार

**जालना । प्रतिनिधी -** मौजे वखारी येथे कुमारी प्रियंका अशोकराव घुले हिची नागपूर कारागृह पोलीसपदी नियुक्ती झाल्याबद्दल भास्कर दानवे जालना विधानसभा प्रमुख यांच्या हस्ते प्रियांकाचा सत्कार करण्यात आला. तसेच यावेळी वखारी येथील दिव्यांग व्यक्तींना ग्रामपंचायतीच्या वतीने किराणा मालाचे वाटप करण्यात आले. यावेळी सिद्धिविनायक मुळे, कैलास उबाळे, वखारी सरपंच सत्यभामा ताई घुले, उपसरपंच संदीपजी बोरुडे, ग्राम पंचायत सदस्य विष्णू घुले, ग्रामपंचायत सदस्य मीनाताई शिंदे, काकासाहेब घुले, निवृत्ती लंके, तंटामुक्ती अध्यक्ष



# कल्याणी तौर विधानसभेच्या रिंगणात!

## जालना विधानसभा निवडणुक; तिहेरी लढत होण्याची शक्यता

**जालना । प्रतिनिधी -** विधानसभा निवडणुकीची घोषणा कोणत्याही क्षणी होण्याची शक्यता असून विधानसभा निवडणुकीत आपले नशिब आजमावण्यासाठी जो-तो आपली कंबर कसत आहे. तर काही उमेदवारांना त्यांच्या समर्थकांकडुन निवडणुक लढविण्यासाठी गळ घातली जाते आहे. जालना विधानसभा मतदार संघात स्व. गजानन तौर यांच्या पत्नी कल्याणी तौर यांना गजुभाऊ तौर यांच्या मित्रमंडळाकडुन व त्यांच्या समर्थकांकडुन निवडणुकीच्या रिंगणात उतरवण्याची तयारी सुरु आहे. यास कल्याणी तौर यांनी देखील सकारात्मक प्रतिसाद देत जालना विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याचा निर्णय घेतला आहे. कल्याणी तौर यांना कोणता पक्ष उमेदवारी देतो की, त्या अपक्ष निवडणुक लढवतात हे लवकरच स्पष्ट होईल. काँग्रेसकडुन इच्छुक असलेले विद्यमान आमदार कैलास गोरंट्याल, शिवसेना शिंदे गट उमेदवार माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर, भाजपाचे भास्कर दानवे, राष्ट्रवादीचे राजेंद्र जाधव, अब्दुल हाफिज, अरविंद चव्हाण अशा जालना विधानसभेसाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांपुढे कल्याण तौर यांचे आव्हान असणार हे मात्र नक्की. जालना विधानसभेसाठी महिला उमेदवारास प्राधान्य देण्यात यावे अशी मागणी देखील मध्यंतरी पुढे येत होती. यावर राजकीय पक्षांनी साधा विचार देखील केला नसल्याने महिला उमेदवार म्हणून देखील कल्याण तौर यांना निवडणुकीत फायदा होण्याची शक्यता राजकीय जाणकार व्यक्त करत आहेत.

जालना विधानसभा मतदारसंघात माजी राज्यमंत्री अर्जून खोतकर व कैलास गोरंट्याल हे कमी-अधिक फरकाने वारंवार आमदार राहिलेले आहेत. परंतु आता नुकताच खासदारकीत रावसाहेब दानवे यांचा पराभव होऊन काँग्रेसचे कल्याण काळे हे निवडून आलेले आहेत. आता विधानसभा निवडणुकांसाठी आचारसंहिता केव्हाही लागू होण्याची शक्यता आहे. जालना विधानसभा मतदारसंघात चांगलीच चुरस यावेळी निर्माण होण्याची शक्यता झाली आहे. तरुणांच्या गळ्यातील ताईत असलेले स्व. गजू तौर यांच्या पत्नी कल्याणी तौर ह्या निवडणूक लढण्याची शक्यता आहे. तसे पाहिले गेल्यास स्व. गजु तौर यांना फार मोठी राजकीय पार्श्वभुमी नाही. असे असले तरी त्यांना मानणारा मोठा वर्ग जालना शहरासह ग्रामीण भागात होता आणि आजही आहे. एका घटनेत गजानन तौर यांची गोळ्या



घालून हत्या करण्यात आली. 'शरिर मिटता है नाम नहीं' हे वाक्य स्व. गजाजन तौर मित्रमंडळ व त्यांच्या सहकाऱ्यांनी कोरून ठेवले आहे. त्यांच्या मृत्यू नंतर कल्याणी तौर यांनी स्व. गजानन फाऊंडेशनच्या माध्यमातून सामाजिक कार्य सुरु ठेवले, रुग्णवाहिकेसह विविध सामाजिक कामे फाऊंडेशनच्या माध्यमातून होत आहे. गणेशोत्सव, नवरात्रोत्सव या काळात कल्याणी तौर यांनी हिरारीने सहभाग घेतला. अडल्या-नडलेल्यांना मदत करणे, त्यांच्या सुख-दुखाःत सहभागी होत कल्याणी तौर यांचा जनसंपर्क वाढला आहे. या वाढत्या जनसंपर्काच्या बळावर जालना विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात कल्याणी तौर यांनी उतरावे अशी इच्छा ताईंच्या समर्थकांकडून होत आहे. यास कल्याण तौर यांनी देखील सकारात्मकता दर्शविली असल्याची माहिती आहे.

जालना विधानसभा निवडणुकीत कल्याण तौर यांनी उमेदवारी दाखल केल्यास त्या विजयी होण्याची शक्यता जाणकार व्यक्त करत आहे. तसे न झाल्यास एखाद्या उमेदवाराचे गणित बिघडवण्यात त्यांचा मोठा वाटा राहणार असल्याचीही शक्यता वर्तविण्यात आली आहे.

गत पंचवार्षिक निवडणुकीत कैलास गोरंट्याल व अर्जुनराव खोतकर यांच्यात थेट लढत पहायला मिळाली होती. यंदा मात्र, कल्याण तौर यांच्या रुपाने महिला उमेदवार जालना विधासभेला मिळणार असल्याने काँग्रेस तसेच शिवसेनेच्या उमेदवाराची धाकधूक वाढणार आहे.

# संपादकीय

## वाचन प्रेरणा दिन

भारताचे माजी राष्ट्रपती मिसाईल मॅन डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस. वाचन आणि लेखन आवडणारे भारताचे माजी राष्ट्रपती डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांच्या स्मरणार्थ आजचा दिवस संपूर्ण देशात वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जातो. देशातील प्रत्येक व्यक्ती सकारात्मक विचार करून स्वतःला समृद्ध कसा करेल आणि त्यायोगे देश महासत्ता कसा बनेल असाच विचार माजी राष्ट्रपती डॉ अब्दुल कलाम करत असत. अब्दुल कलाम यांनी १९९६ साली इंडिया २020 हे पुस्तक लिहिले. याच पुस्तकाच्या आधारे तेंव्हाच्या नियोजन आयोगाने व्हिजन २020 तयार केले. डॉ अब्दुल कलाम यांनी अग्निपंख नावाने आत्मचरित्र लिहिले त्यात त्यांनी बालपणापासून राष्ट्रपती बनण्यापर्यंतच्या प्रवासाचे वर्णन केले आहे. डॉ अब्दुल कलाम यांनी एकूण २४ पुस्तके लिहिली असून त्यातील बहुतांशी पुस्तके विद्यार्थी आणि शिक्षकांसाठीच लिहीली आहेत. विद्यार्थ्यांनी जास्तीतजास्त पुस्तके वाचून स्वतःचे ज्ञान दृढ करावे असा त्यांचा आग्रह होता. वाचनानेच माणूस समृद्ध बनतो असे त्यांचे मत होते. त्यासाठी लहान वयातच मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण करावी असे ते नेहमी म्हणत. आजचा दिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यामागचे मुख्य कारण म्हणजे आजच्या मोबाईल, इंटरनेट आणि सोशल मीडियाच्या युगात विद्यार्थ्यांचे वाचन कमी होत चालले आहे. पूर्वी विद्यार्थ्यांमध्ये जशी वाचनाची आवड होती तशी वाचनाची आवड आजच्या विद्यार्थ्यांमध्ये दिसून येत नाही. आजच्या सोशल मीडिया व इंटरनेटच्या युगात पुस्तक वाचनाचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत चालले आहे. विद्यार्थ्यांमधील अवांतर वाचनाची गोडी कमी होत चालली आहे. पूर्वी गजबजणारी वाचनालये आता ओस पडू लागली आहेत. ग्रंथालयातील पुस्तके वर्षानुवर्षे एकाच जागी धूळ खात पडत आहेत. साहित्य संमेलनामध्ये पुस्तकांची विक्री कमी होऊ लागली आहे. आजची पिढी सोशल मीडियाच्या आहारी गेल्याने पुस्तकांपासून दूर होत चालली आहे. सोशल मीडियाच्या आक्रमणामुळे विद्यार्थी अवांतर वाचन विसरून चालले आहेत. सोशल मीडियामुळे वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे. वाचन संस्कृती टिकवण्यासाठी आणि विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी शाळा महाविद्यालयात हा दिवस साजरा केला जातो. या दिवशी शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना वाचनासाठी पुस्तके दिली जातात. वाचलेल्या पुस्तकांवर चर्चा केली जाते. आजच्या दिवशी शाळा महाविद्यालयात तसेच सरकारी आस्थापनात विविध कार्यक्रम, चर्चासत्रे, प्रशिक्षणे आयोजित केली जातात. वाचन संस्कृती जोपासण्यासाठी सर्वानी आपल्या मित्रांना, नातेवाईकांना एक पुस्तक पुस्तके भेट द्यावे. आजच्या दिवशी प्रत्येकाने किमान एक पुस्तक वाचावे. वाचन प्रेरणा दिन हा एक स्तुत्य उपक्रम आहे. आजच्या युगात ज्ञान ही खूप मोठी शक्ती आहे, याचाच आपल्याला विसर पडला आहे. वाचनामुळे आपल्याला इतिहासाचे ज्ञान, वर्तमानाचे भान आणि भविष्याचा वेध घेता येतो. ज्ञान मिळवण्याचे सर्वात प्रभावी माध्यम म्हणजे वाचन. सातत्याने वाचन केल्याने आपली ग्रहण क्षमता आणि स्मरण शक्ती अधिकाधिक सशक्त होऊन बुद्धिमत्ता अधिकाधिक प्रगल्भ होते. त्यातून माणसाच्या विचार पातळीचा चोहोबाजूंनी विकास होतो. वाचनामुळेच माणसाच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होते. वाचनामुळे माणूस सुसंस्कृत होतो. चांगलं वाचल्यावर, चांगलं ऐकल्यावर आपले विचार विवेकशील व प्रगल्भ होतात. त्यातून आपली मनोभावना शुद्ध होते. आपली भाषा तसेच वक्तृत्व विकसित होते. वाचनामुळे आपले व्यक्तिमत्त्व बहरते. वाचन ही जीवनाला उन्नत करणारी बाब आहे यामुळे बुद्धीची मशागत होते. माणसाचे जीवन फुलवण्यात वाचनाचा मोठा वाटा असतो. त्यामुळे वाचनाचा छंद जोपासून आपले जीवन समृद्ध करायला हवे. मनावरचा ताण कमी करण्यासाठी पुस्तकांच्या सहवासात रमले पाहिजे. चांगल्या पुस्तकांचा, विचारांचा आपल्या जीवनावर सकारात्मक परिणाम होतो आणि आयुष्याकडे पाहण्याचा आपला दृष्टकोन कायमचा बदलतो. ऐतिहासिक पुस्तकांमुळे वाचकांच्या मनात राष्ट्रनिष्ठा निर्माण होते. कथा - कादंबरी वाचनाने वाचकांच्या मनात माणुसकीचा भाव जागृत होतो. काव्य वाचनातून आपल्या मनात संवेदनशीलता निर्माण होते. थोरांची चरित्रे वाचून प्रेरणा मिळते. वर्तमानपत्रे वाचल्याने सामाजिक जाणिव निर्माण होते. पुस्तकांमुळे कमकुवत मनाला धीर मिळतो त्यामुळे निराशेच्या गर्तेत अडकलेला माणूस हत्या, आत्महत्या करण्यापासून परावृत्त होतो. आजकालच्या मुलांना खूप ताण असतो. हा ताण कमी करण्याचे प्रभावी मध्यम म्हणजे वाचन. एकूणच वाचनामुळे माणूस सर्वगुणसंपन्न होतो त्यांच्यात नैतिकतेची रुजवण होते. आज वाचनाअभावी समाजातील नैतिक मूल्ये हरवत चालली आहेत त्यामुळे नव्या पिढीने पुन्हा एकदा वाचन संस्कृतीकडे वळणे ही काळाची गरज आहे. आपल्या आणि समाजच्या भल्यासाठी वाचन संस्कृती टिकवायलाच हवी. वाचल तर वाचाल या उक्तीप्रमाणे तरुण



पिढीला वाचवायचे असेल तर त्यांच्यात वाचन संस्कृती रुजवायलाच हवी. त्यासाठी वाचन प्रेरणा दिन यासारखे उपक्रम नक्कीच उपयोगी ठरेल.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# इतिहास अभिजात माय मराठीचा

**मराठी असे आमुची मायबोली जरी आज ही राजभाषा नसे**
**नसो आज ऐश्वर्य या माउलीला, यशाची पुढें दिव्य आशा असे**

कवी माधव ज्युलियन सह अनेक साहित्यिकांचा विश्वास सार्थ करत ३ ऑक्टोबर २०२४ रोजी अखेर मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. कित्येक वर्षापासूनच्या संघर्षाचा हा, गोड शेवट, जणू सोनियाचा दिवस. नवरात्रीच्या पहिल्या माळेचा मान आपल्या मराठी भाषेला अभिजात भाषा म्हणून मिळाला. किती दुग्ध शर्करा योग हा. विद्यमान मायबाप सरकारसह या संदर्भात काम करणाऱ्या अनेक विध समित्यांचे अहवाल व अनेक मान्यवरांसह समस्त मराठी जणांनी केलेल्या अथक परिश्रमाचे चीज झाले. या आनंदाच्या क्षणी आपल्यासमोर कोणत्याही भाषेला अभिजात भाषेचा सन्मान कसा प्राप्त होतो? अभिजात भाषा म्हणजे काय? हे सांगत मराठी भाषेचा व महाराष्ट्राचा इतिहास मांडण्याचा हा प्रयत्न.

साहित्य अकादमीने एखाद्या भाषेला अभिजात दर्जा देण्यासंबंधी खालील प्रमाणे निकष निश्चित केले आहेत. अभिजीत भाषा १५00 ते २000 वर्षाहून अधिक जुनी असावी आणि तेवढेच मौल्यवान प्राचीन वाङ्मय त्या भाषेत असावे. त्या भाषेची स्वतःची परंपरा असावी आणि त्यासाठी अन्य भाषांवर अवलंबून नसावे. भाषेचे आधुनिक रूप हे तिच्या प्राचीन रूपाहून भिन्न असले तरी चालेल पण त्यांच्यात आंतरिक नाते असावे.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा म्हणून महाराष्ट्र शासनाच्या मराठी विभागाने प्रा. रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली. हा सर्व खटाटोप करण्यामागे मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर दरवर्षी केंद्राकडून मराठीच्या विकासासाठी व संशोधनासाठी ५00 कोटी रुपये मिळतील हा एक स्पष्ट दिसणारा फायदा होता. परंतु आपल्या मराठी भाषेविषयी आपल्यालाच खरेखुरे प्रेम हवे, अभिमानही हवा पण तो दुर्दैवाने तसा दिसत नाही हेही सत्य नाकारून चालणार नाही.......

संयुक्त महाराष्ट्राच्या दैदीप्यमान चळवळींच्या माध्यमातून शेवटी त्यावेळचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूजींसह यशवंतराव चव्हाण संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश १ मे १९६0 या शुभ दिनी घेऊन आले आणि पहाटे संयुक्त महाराष्ट्राच्या नवीन राज्याचे उद्घाटन झाले. लोकनेता, समतोल राजकारणी, व्यवहार चातुर्य, कुशल प्रशासक स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांनी आधुनिक महाराष्ट्र घडविला. हा सामर्थ्यवान महाराष्ट्र मग म्हणू लागला.

**महाराष्ट्र मेला तरी राष्ट्र मेले।**
**मराठ्यांविना राष्ट्रगाडा न चाले।।**
**खरा वीर वैरी पराधीनतेचा।**
**महाराष्ट्र आधार या भारताचा।।**

अशा या कणखर, राकट, तरीही नाजूक, कोमल, फुलांच्या देशाला शौर्याच्या, धैर्याच्या देशाला आमचा कोटी कोटी प्रणाम. भाषा बोलणार्यांच्या प्रमाणाचा विचार केला तर मराठी भारतात क्रमांक ३ वर व जगात क्रमांक १0 वर सर्वात जास्त बोलली जाणारी भाषा आहे. मराठीत ५४ बोलीभाषा आहेत. घटनेनुसार १९६५ पासून महाराष्ट्र राज्याची देवनागरी लिपीतील मराठी भाषेचा आपण राजभाषा म्हणून स्वीकार केला आहे. आता तिला अभिजात भाषेचाही दर्जा मिळाला आहे. अभिजात भाषा म्हणजे 'वैशिष्ट्यपूर्ण भाषेला भारत सरकारकडून दिला जाणारा दर्जा' जो काल पर्यंत तमिळ, संस्कृत, तेलुगू, कन्नड, मल्याळम, ओडिया यांना मिळाला होता. तो आज मराठी सोबत पाली, प्राकृत, बंगाली, असामी याही भाषांना मिळाला. पण मराठीच्या व महाराष्ट्राच्या उगमाचा विचार करता रामायण महाभारता पासून अनेक संदर्भ सापडतात .

रामायणात प्रभू रामचंद्र व सीता माई सध्याच्या नाशिक येथील पंचवटीत राहत होते तर महाभारतातील भगवान श्री कृष्णाची पत्नी रुक्मिणी कौडिन्यपूर राजाची राजकन्या होती. कौडिन्यपूर आताच्या नागपूर जवळ आहे.

पण इतिहास दृष्टिकोनातून विचार करता इ.स. पूर्व तिसऱ्या शतकात गौतम बुद्धांचा शिष्य मोगलीपुत्त दिस्स याने बौद्ध धर्माच्या प्रचारासाठी मराठी प्रदेशात शिष्य पाठविल्याचा संदर्भ सापडतो. त्यानंतरच्या काळात हा प्रदेश मौर्य साम्राज्याचा भाग असल्याचा संदर्भ इतिहासात सापडतो. सम्राट अशोकाच्या काळात महाराष्ट्रातील सोपारा आताचे नालासोपारा या बंदरातून पूर्व आफ्रिका, मेसोपोटेमिया, एडन व कोचीन असा व्यापार चालू असे. इ.स. पूर्व चे २ रे शतक ते इ स चे २ रे शतक या कालखंडात येथे सातवाहन राजे राज्य करीत होते .हा कालखंड म्हणजे समृद्धीचा, विदेशी व्यापाराचा कालखंड . या कालखंडात दोन समृद्ध ग्रंथ लिहिले गेले ते प्राचीन मराठी प्राकृत भाषेत लिहिले, पहिला ग्रंथ गुनाढ्याचा कथासरित्सागर किंवा बृहत कथासरित्सागर, त्यात वर्णन असलेला मराठी समाज वैभवसंपन्न आहे . दुसरा ग्रंथ सातवाहन राजा हाल ने रचलेली गाथासप्तशती . या कालखंडात भाषेचे वहन झाले ते शौरसेनी पैशाची चे पुढे मराठी कडे मार्गक्रमण झाले सातवाहन राजा गौतमीपुत्र सातकर्णी ने इ.स. ७८ मध्ये शालिवाहन शक सुरू केले. सातवाहन राजांचे वैशिष्ट्य म्हणजे ते पराक्रमी व प्रगतीशील होते. सातवाहनांनंतर महाराष्ट्रात वाकाटकांचे साम्राज्य होते, त्यांची राजधानी विदर्भातील वत्स्यगुल्म म्हणजे आताचे वाशिम .वाकाटक व गुप्तांचा कालखंड एकच इ.स. ४ थे, ५ वे, ६ वे शतक,.

वाकाटकांनंतर या प्रदेशावर चालुक्यांचे राज्य होते. ७ व्या शतकात भारतात आलेल्या चिनी प्रवासी युवानश्वांग ने चालुक्य राजा दुसरा पुलकेशी याची गोदावरीच्या काठी असलेल्या त्याच्या प्रतिष्ठान म्हणजे आताचे पैठण नामक राजधानीत भेट घेतल्याचा संदर्भ त्याच्या प्रवासवर्णनात लिहून ठेवला आहे. त्यात तो मराठी माणसाचे वर्णन करताना सांगतो मराठी वृत्तीने प्रामाणिक आहेत, मित्रासाठी जीव देणारे आहेत, शत्रुत्व झाले तर जीव घेणारेही आहेत. वाकाटक, चालुक्य, व राष्ट्रकुट राजांच्या काळात अजिंठा-वेरूळची लेणी तयार झाली.

दक्षिणेत रठीक नावाचा जनसमूह होता या रठीक चे संस्कृतीकरण झाल्यावर राष्ट्रीक असा शब्द तयार झाला त्यातूनच पुढे महाराष्ट्र हा शब्द तयार झाला असे मत अनेक इतिहास लेखकांचे आहे. अशा या महाराष्ट्रातील मराठीची पहिली अद्याक्षरे सापडतात ती कर्नाटकातील म्हैसूर जवळील श्रवण बेळगोळा येथील वर्धमान महावीरांच्या भव्य पुतळ्याखाली मराठी ची अद्याक्षरे कोरलेली आहेत.

'श्री चामुंडराये करवियले
गंगाजे सुत्ताले करवियले'

ही मराठीची अद्याक्षरे असून त्या पुतळ्याचे नाव भद्रबाहू आहे .या शिलालेखावर इ.स.९वे शतक असे कोरले आहे .

मराठीचा जन्म प्राकृतोद्भव की संस्कृतोद्भव पण ह्या प्रश्नाचे उत्तर शोधताना बहुसंख्य भाषाशास्त्री मान्य करतात की मराठी संस्कृतोद्भव आहे . तिच्यावर प्राकृताचे सुद्धा सखोल संस्कार आहेत .शब्द संख्येचा विचार केला तर मराठीत ९५ टक्के शब्द संस्कृत पासून आले आहेत.

अनेक इतिहास संशोधकांच्या मते मराठी भाषेतील पहिला ग्रंथ विवेकसिंधु असून तो मुकुंदराज यांनी लिहिला. ते मराठवाड्यातील अंबेजोगाई येथील आहेत. हा ग्रंथ १२ व्या शतकात लिहिला गेला. त्यानंतर सुमारे ७५ ते १00 वर्षांनी महानुभाव पंथाच्या चक्रधर स्वामींनी लीळाचरित्र ग्रंथ लिहिला. त्यानंतर मराठी भाषेचा विकास वेगाने झाला. यादव काळात मराठीला राजभाषेचा दर्जा मिळाला . यादवांचे राज्य अनेक अर्थाने शांततेचे, संपन्नतेचे व विकासाचे राज्य होते .या कालखंडात संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी या ग्रंथाची रचना केली व त्यातून अवघे विश्वचि माझे घर हे सांगताना आपली जागतिकीकरणाची दृष्टी स्पष्ट केली. शंकराचार्य मूळचे केरळातील पेरिया उर्फ पूर्णा नदीच्या काठावरील केरली गावचे. त्यांनी मांडलेला विचार निवृत्तीनाथांच्या माध्यमातून ज्ञानेश्वरांना मिळाला. ज्ञानेश्वरांनी सर्वसामान्यांसाठी भक्तीचा मार्ग सांगितला व वारकरी संप्रदायाची स्थापना केली. पुढे हा विचार ज्ञानेश्वरांचे शिष्य नामदेवांनी उत्तरेत नेला. महाराष्ट्रात संत तुकारामांनी याच विचाराचा विकास केला म्हणूनच म्हणतात

'ज्ञानदेवे रचिला पाया तुका झालासे कळस'

मराठीची गौरव पताका ज्या जोडगोळीमुळे अभिमानाने डोलते ती हीच ज्ञानबातुकोबाची जोडी. इ.स.१३१0 पर्यंत महाराष्ट्रात यादवांचे राज्य होते. यादवांनी ठिकठिकाणी वैशिष्ट्यपूर्ण अशी हेमाडपंथी मंदिरे बांधली, याच काळात भास्कराचार्यांनी लीलावती हा गणितावर संस्कृत भाषेतील ग्रंथ लिहिला. १३२५ ते १५६५ दक्षिण भारतात विजयनगरचे साम्राज्य होते . पण १३ व्या शतका पासून महाराष्ट्रावर इस्लामी आक्रमणे सुरू झाली .अल्लाउद्दीन खिलजी, मोहम्मद बिन तुघलक, मोगल व सुलतानशाही यांनी १६ व्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत महाराष्ट्राच्या बऱ्याच मोठ्या भागावर राज्य केले . यादवांच्या अस्तानंतर समाज जागृत व एकसंघ ठेवण्याचे काम संतांनी केले .संतांचे कार्य, यादवांचा इतिहास व छत्रपती शिवरायांची प्रेरणा यातून मराठ्यांनी देशभर साम्राज्य उभे केले.कितीही संकटे आली, प्रचंड प्रतिकूल परिस्थिती असली तरी मोठी स्वप्ने पाहता येतात व ती सत्यात उतरवता येतात याच मूर्तीमंत उदाहरण म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज .

महाराजांनी राज्य निर्मिती सोबत भाषा शुद्धीकरणाच्या चळवळीचे बहुमोल कार्य केले. त्यांनी राज्यव्यवहार कोश निर्माण केला

स्वराज्याच्या सीमे बद्दल छत्रपती शिवाजी महाराजांनी सांगून ठेवले आहे ' सिंधू नदीच्या उगमापासून कावेरीच्या संगमापर्यंत म्हणजेच पेशावर पासून तंजावर पर्यंत हिंदवी स्वराज्य व्हावे हि तर श्रींची इच्छा '. जेव्हा मराठे १७५७ ला अटकेपार पोहोचले तेथून रघुनाथरावाने पेशवे नानासाहेबांना पत्राद्वारे कळविले थोरल्या आबासाहेबांनी (छत्रपती शिवाजी महाराजांनी ) दिलेले स्वप्न आपण पूर्ण करीत आणले आहे .पुढे आपण आदेश द्याल तर मराठी जरीपटका काबूल कंदाहार वर फडकवू . पण त्याच वेळी इकडे प्लासीच्या लढाईत इंग्रजांची सरशी झाली होती तेव्हा तुम्ही परत या , कारण पेशव्यांसहित समस्त मराठ्यांना समजत होते की इंग्रजांपासून आपल्याला धोका आहे . आज पानिपतच्या आठवणीने ही प्रत्येक मराठी मन सुन्न होते . अब्दाली ही कळून चुकला होता व युद्ध जिंकल्यावरही परत गेला .

१८१८ ला मराठी सत्तेच्या अस्तानंतर ही इंग्रजांना महाराष्ट्रात सुखासुखी राज्य करता आले नाही. शिवरायांचा वारसा पुढे महाराष्ट्राने सुरू ठेवला .कारण आपण पारतंत्र्यात का गेलो हा विचार तेवढ्याच वेगाने सुरू झाला .आत्मगत चिंतन सुरू झाले. शाळा सुरू झाल्या पाहिजे. इंग्रजी शिक्षण मिळाले पाहिजे. विषमता दूर केली पाहिजे. १८२१ मध्ये बाळशास्त्री जांभेकरांनी दर्पण च्या माध्यमातून पहिले वृत्तपत्र सुरू केले . पेशव्यांच्या दरबारी असणारे गोपाळ हरी देशमुख (लोकहितवादी) यांनी आपल्या दोषांचा अभ्यास करत शतपत्रे लिहिली . येथे स्वतःकडे कठोरपणे पाहण्याची मराठी माणसाची वृत्तीच अधोरेखित होताना दिसते. १८५७ च्या उठावात भाग घेणारे मराठी सेनानी राणी लक्ष्मीबाई, नानासाहेब पेशवे, तात्या टोपे यांचे स्वप्न एकच होते फिरंग्यांच्या तावडीतून देश मुक्त करू. आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडकेच्या रूपात क्रांतिकारकांचे किंवा भारतीय असंतोषाचे जनक लोकमान्य टिळकांच्या रूपात राजकीय सुधारणेचे किंवा फुले-शाहू-आंबेडकरांच्या रुपात समाज व धर्म सुधारणेचेही महाराष्ट्र केंद्रबिंदू ठरले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एकाच वेळी चातुर्वर्ण व्यवस्थेशी लढा दिला, दलितांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध लढले आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे संविधान निर्मितीचे अभ्यासपूर्ण कार्य केले.

हिंदू राष्ट्रवादाचा विचार मांडणारे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर हे या विचारधारेचे एक तर दुसरे आर .एस .एस . चे प्रणेते डॉ. हेगडेवार मूळचे आंध्रचे असले तरी विचारांचे मुख्य केंद्र महाराष्ट्रातील नागपूर हे होते. भारतातील कम्युनिस्ट पक्षाचे संस्थापक सदस्य श्रीपाद अमृत डांगे महाराष्ट्रातील. टाटांच्या बरोबरीने लक्ष्मणराव किर्लोस्कर यांनी महाराष्ट्रात उद्योग सुरू केले. लुनिए ब्रदर्स ने पहिला चित्रपट केला तो दादासाहेब फाळकेंनी बघितला त्यातून त्यांनी पहिला मराठी चित्रपट बनविला तो पूर्णपणे भारतीय दृष्टिकोनातून व त्या चित्रपटाचे नाव होते 'अयोध्येचा राजा ' म्हणून त्यांना भारतीय चित्रपट सृष्टीचे जनक मानले जाते .

शेतीतील सहकार चळवळीचा जन्म महाराष्ट्रातील पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटलांनी प्रवरानगर येथून सहकारातुन उद्योग व्यवसाय विकसित केला .पुढे यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, रत्नाप्पा कुंभार, तात्यासाहेब कोरे, काकासाहेब वाघ व नंतर देशभर चळवळ विकसित झाली .

शेतकरी संघटित करणे हे अशक्य वाटणारे काम शरद जोशींनी करून दाखविले. 'शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित रास्त भाव मिळाला पाहिजे' हा विषय घेऊन त्यांनी चळवळ उभी केली, त्याचा देशाच्या धोरणावर प्रभाव पडला, कृषी आयोग बनवावा लागला, शरद जोशी त्याचे अध्यक्ष झाले .

स्त्री मुक्ती चळवळ - महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यानी स्त्री शिक्षणाची सुरुवात केली, आनंदीबाई जोशी, ताराबाई शिंदे या सारख्या अनेक स्त्रियांनी शिकून महत्त्वपूर्ण योगदान दिले.

महाराष्ट्रात साठोत्तरी साहित्यात दलित साहित्य मोठ्या प्रमाणात निर्माण झाले. महाराष्ट्र भूषण पु. ल. देशपांडे या साहित्या संदर्भात म्हणतात, मनुष्य, समाज, निसर्ग आणि नियती यांनी निर्माण केलेल्या नाना प्रकारच्या दुखांनी गदगदलेल्यांच्या व्यथा आणि वेदना प्रकाशात आणल्या. त्यामध्ये अण्णाभाऊ साठे, दया पवार, बाबुराव बागुल, केशव मेश्राम, माधव कोंडविलकर, नामदेव ढसाळ, शरणकुमार लिंबाळे, यांची नावे घेता येतील. आदय नाटककार विष्णुदास भावे यांचा १८५३ साली सांगलीच्या राजवाड्यात 'सीता स्वयंवर' या पहिल्या मराठी नाटकाचा प्रयोग झाला आणि मराठीतील नाट्य परंपरेचा जन्म झाला. गानसम्राज्ञी लता मंगेशकर व मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर या दोन महाराष्ट्रातील भारत रत्नांनी आपापल्या कार्यक्षेत्रात केलेल्या देदीप्यमान कामगिरीने जग जिंकले.

पुण्यातील बिंदुमाधव जोशी यांनी ग्राहक संघटना बांधायला सुरुवात केली पुढे १९८६ मध्ये पंतप्रधान राजीव गांधींनी लक्ष घातले व ग्राहक संरक्षक कायदा अस्तित्वात आला .

इतरांनी केले त्याचे निरीक्षण करून त्यात नवी भर घालून नवे काम करणे हेच मराठी माणसाचे खरे वैशिष्ट्य आहे. मराठी भाषेला मिळालेला अभिजात भाषेचा दर्जा हा मराठी भाषेच्या इतिहासातील अत्यंत गौरवपूर्ण क्षण व्यक्त करताना मला शब्द सापडत नाहीत. इतका हा क्षण आपल्या सर्वांसाठी गौरवपूर्ण आहे त्यानिमित्ताने महाराष्ट्राचा, मराठी भाषेचा व मराठी माणसाच्या कार्यकर्तृत्वाचा इतिहास मांडला आहे. शेवटी कवी श्रेष्ठ माधव ज्युलियन यांच्या याच ओळींचा आधार घेत म्हणावेसे वाटते.

हिचे पुत्र आम्ही हिचे पांग फेडूं वसे आमुच्या मात्र हृन्मंदिरीं जगन्मान्यता हीस अर्पूं प्रतापें हिला बैसवूं वैभवाच्या शिरीं ।।

**प्रा. प्रशांत पुंडलिक शिरूडे,**
**के. रा.कोतकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय डोंबिवली**
Email - prashantshirude1674gmail.com
**९९६७८१७८७६**

## पान १ वरुन

### विधानसभा सार्वत्रिक ...

मुद्रण केल्यानंतर मुद्रित साहित्याची प्रत जिल्हा निवडणुक अधिकारी जालना तसेच संबंधित निवडणुक निर्णय अधिकारी यांच्याकडे पाठवावी. अन्यथा संबंधित मुद्रणालयाचा परवाना रद्द करण्यासह कठोर कारवाई करण्यात येईल. या ठिकाणी निवडणूक पत्रक किंवा भित्तीपत्रक याचा अर्थ उमेदवाराच्या प्रचारासाठी वाटण्यात आलेले मुद्रीतपत्रक, हस्तपत्रक किंवा अन्य दस्तऐवज किवा निवडणूकीशी संबंधित असा घोषणा फलक किंवा भित्तीफलक असा होतो. जी व्यक्ती उपरोक्त निर्बंधांचे व्यतिक्रमण करील ती व्यक्ती सहा महिन्यापर्यंत असु शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास किंवा दोन हजार रूपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्य दंडास किंवा दोन्ही शिक्षेस पात्र राहिल. विधानसभा सार्वत्रिक निवडणूक- २०२४ लढविणारे उमेदवार, राजकीय पक्ष तसेच मुद्रणालय चालकांनी सूचनांची नोंद घ्यावी. अधिक माहितीसाठी आयोगाच्या संबंधित निर्देशांचे अवलोकन करावे. असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### श्रेय घ्यायला ...

यांच्या पाठपुरावा व मागणीमुळे जालन्याला मेडीकल कॉलेज मिळाले म्हणत याचे श्रेय अर्जुनराव खोतकर यांचे असल्याचे अधोरेखीत केले. मुख्यमंत्री शिंदे यावेळी म्हणाले की, राज्यात सरकार आमचे, केंद्रात सरकार आमचे आणि काँग्रेसने कसे काय मेडीकल कॉलेजचे श्रेय घेते राज्यात आमच्या सरकारला व केंद्रात मोदी, शहांना रोज शिव्या घालतात. अर्जुनभाऊंनी मेडीकल कॉलेजची मागणी केली पाठपुरावा केला म्हणून हे कॉलेज झाले असेही मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

### रस्ता नव्हे ...

जवाबदार आहेत. यासंदर्भात विविध राजकीय व सामाजिक कार्यकर्त्यांसह नागरिकांनी निवेदने दिलेली आहेत. जालना काँग्रेस अनुसुचित जाती जमातीच्यावतीने आंदोलनही करण्यात आले आहे. मात्र, अद्याप हा विषय मार्गी लागलेला नाही. जनतेला न्याय मिळालेल नाही. रेल्वे स्टेशन ते गांधीचौक या रस्त्याचे मागील सहा महिन्यापासून काम अर्धवट अवस्थेत आहे. या रस्त्यावर अनेक अपघात होत आहे, रस्त्यामध्ये रोहित्र व वीजेचे खांब उभे आहेत. अशाच नुतन वसाहत भागात रस्त्यावरील खांबामुळे एका जेल पोलिसाचा मृत्यू झालेला आहे. रस्त्यावरील खांब बाजूला करण्यासाठी आयुक्त महानगरपालिका, कार्यकारी अभियंता, नियोजन विभाग टोलवाटोलवी करीत आहे. या बाबत अनेक निवेदने दिली परंतु उपयोग होत नाही. नुतन वसाहत येथील पाण्याच्या टाकीत इसम मृत्यू मुखी पडून दूषित पाणी पुरवठा केला गेला. या टाक्यांची सुरक्षा व्यवस्था अत्यंत हिन दर्ज्याची झालेली आहे. जनावरे सूध्दा टाकीच्या अवती भोवती जातात. त्यामुळे सदर टाकीला सेप्टी गेट व जाळ्या लावुन त्या ठिकाणी सिसिटीव्ही कॅमेरे लावणे गरजेचे आहे. पाण्याच्या टाकीच्या आजुबाजुला अतिक्रमणे झालेली आहेत ती सुध्दा काढणे अत्यंत आवश्यक आहे,जालना शहरातील लक्कडकोट, गांधी चौक, शनिमंदिर, अलंकार टॉकीज, सुभाष चौक, महावीर चौक, मम्मादेवी मंदिर या भागातील वाहतूक संपूर्णपणे कोलमडलेली असून यावर पोलीस अधीक्षक, वाहतुक शाखा, मनपा आयुक्त यांना आदेश देऊन वाहतूक व्यवस्थेत सुधारणा करावी. या विभागात पोलीस कॉन्स्टेबल १२ तासा करिता असणे जरुरीचे आहे किंवा संबंधीत ठिकाणीं सिंग्नल लावण्याची आवश्यकता आहे. जालना रेल्वे स्टेशन पासुन जे अन्न धान्य पुरवठा करण्याचे जे ठिकाण आहे ते हलविणे गरजेचे आहे कारण आऊट ऑफ डेट झालेले ट्रक्स या ठिकाणाहून जोरात व सुसाट चालतात त्यांना कोणतेही भान राहत नाही, त्यामुळे नेहमी त्या रस्त्यावर अपघात होतात, या अगोदर या रस्त्यावर सहा शाळकरी मुले मरण पावलेली आहेत. यावर सुध्दा लक्ष देणे गरजेचे आहे. महानगर पालिकेकडुन सुविधांच्या बदल्यात घेण्यात येणारी फी अव्वाच्या सव्वा वाढविलेली आहे ती सुध्दा कमी करण्याचीही मागणी कृति समितीच्यावतीने करण्यात आली आहे. या समस्यांचे निराकरण येत्या आठ दिवसात न झाल्यास जालना कृति समितीच्यामार्फत विविध सामाजिक संघटनेच्यावतीने आंदोलन करण्यात येईल व होणाऱ्या परिणामास प्रशासन जवाबदार राहणार असल्याचेही निवेदनात नमूद आहे. निवेदनावर दिनकर घेवंदे, रमेश देहेडकर, नंदकुमार जांगडे, राजेंद्र जाधव, जय खरात, रघुवीर गुडे, बाबसाहेब सोनकर, अनील साळवे, जावेद आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# चंदनझिरा भागात अल्पवयीन बालिकेवर अत्याचार

## आरोपी पोलीसांच्या ताब्यात;





**घटनेनंतर सोमवार (दि १४) जालना -छत्रपती संभाजीनगर महामार्गावर रास्ता रोको करण्यात आला यावेळी राजकीय नेत्यांसह संतप्त नागरिक पहिल्या छायाचित्रात तर दुसऱ्या छायाचित्रात घटनेतील आरोपीला ताब्यात घेतल्यानंतर पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल यांच्यासह स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी- कर्मचारी.**

### नागरिकांचा रास्ता रोको

अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाल्याची खळबळजनक घटना उघडकीस आल्यानंतर संतप्त नागरिकांनी सोमवार (दि १४) सकाळी अकरा वाजेच्या दरम्यान जालना-छत्रपती संभाजीनगर महामार्गावर जोरदार निदर्शने करीत रास्तारोको केला. पोलीस प्रशासनाविरोधात घोषणाबाजी केली. बदलापूर घटनेप्रमाणेच आरोपीच एन्काऊंटर करण्याची मागणी संतप्त नागरिकांनी केली. यावेळी आ. कैलास गोरंट्याल, भास्कर अंबेकर, अभिमन्यू खोतकर, गणेश राऊत, सतीश जाधव यांच्यासह नागरिकांची उपस्थित होती. चंदनझिरा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सम्राटसिंग राजपुत यांच्या आश्वासनानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

**जालना | प्रतिनिधी -** शहरातील चंदनझिरा भागातील एका ९ वर्षीय अल्पवयीन मुलीला रविवार (दि १३) रात्री अकरा वाजेच्या सुमारास पळवून नेत काही नराधमांनी तिच्यावर अत्याचार केला होता. या घटनेतील आरोपीला पोलीसांनी ताब्यात घेतले आहे. अल्पवयीन बालिकेवर जिल्हा स्त्री रुग्णालयात उपचार करुन पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथे हलविण्यात आले आहे. या घटनेची माहिती सोमवार (दि १४) सकाळी मिळताच चंदनझिरा परिसरात विविध पक्षातील राजकीय नेत्यांसह नागरिकांनी गर्दी केली होती. आरोपीला तात्काळ अटक करा, आरोपीचे एन्काऊंटर करा अशी मागणी संतप्त नागरिकांकडून करण्यात येत होती.

शहरातील चंदनझिरा भागात राहणाऱ्या एका ९ वर्षीय अल्पवयील मुलीस उचलून नेण्यात आले. या मुलीची आई कामगार साहित्य आणण्यासाठी गेली होती. घरात एकटी झोपलेली असल्याचे पाहून या चिमुकलीला बळजबरीने उचलून नेत तिच्यावर अत्याचार करण्यात आले. या घटनेनंतर चंदनझिरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. अत्याचाराच्या घटनेनंतर पिडीताला तातडीने जिल्हा स्त्री रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तेथे प्रथोमोपचार करुन तिला पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथे पाठविण्यात आले.

या गंभीर घटनेची पोलीस अधिक्षक अजयकुमार बंन्सल यांनी तातडीने दखल घेत घटनास्थळी धाव घेत पोलीसांना सूचना केल्या. त्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने आदित्य सुभाष जाधव (वय १९ वर्षे) यास ताब्यात घेतले. त्याच्याकडे गुन्ह्याच्या संदर्भाने चौकशी केली असता त्यांने गुन्हा कबुल केला असल्याची माहीती पोलीसांनी दिली आहे. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सपोनि योगेश साबळे, सपोनि राजेंद्र वाघ, सॅम्युअल कांबळे, संभाजी तनपुरे, प्रभाकर वाघ, दीपक घुगे, रमेश राठोड, जगदीश बावणे, सागर बाविस्कर, ईशाद पटेल, देविदास भोजने, भागवत खरात व स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीसांनी ही कारवाई केली आहे.

## पारडगाव येथे सामुदायिक आरोग्य शिबीर संपन्न




**परतूर | प्रतिनिधी -** उपमुख्यमंत्री राज्यस्तरीय विशेष वैद्यकीय मदत कक्ष, गणपती नेत्रालय, धर्मादाय आयुक्त कार्यालय, जालना आरोग्य भारती व कै. सुंदरराव ढेरे पाटील बहुउद्देशीय सेवाभावी संस्था पारडगाव* यांच्या संयुक्त विद्यमाने पारडगाव येथे विनामूल्य सामुदायिक आरोग्य शिबिर दि. ११/ १०/ २०२४शुक्रवार रोजी आयोजित करण्यात आले.. त्यामध्ये ९५ जणांची नेत्र तपासणी, ४८ जणांची रक्त तपासणी व ३८ जणांची एउत्र तपासणी करण्यात आली. सर्व शासकीय योजनांची माहिती देण्यात येवुन लाभार्थ्यांसोबत संवाद साधण्यात आला.

यावेळी डॉ. स्वप्नील बी. मंत्री महाराष्ट्र शासन नियुक्त सदस्य उपमुख्यमंत्री राज्यस्तरीय विशेष वैद्यकिय मदत कक्ष, डॉ संदीप चोपडे, डॉ. सुधीर आंबेकर जिल्हा उपाध्यक्ष, आरोग्य भारती जालना, सरपंच गोरख जाधव, उपसरपंच शफी अहमद सय्यद, श्री गजाननराव ढेरे डॉ हरिप्रसाद ढेरे, डॉ कैलाश ढेरे, गणपती नेत्रालयाचे डॉ अनुकुमारी, डॉ वृंदा आंबेकर, संतोष नाईक, गणेश जूंगडे, महालॅबचे युनूस पठाण, बालाजी मुसळे, परमेश्वर ढेरे, भारत स्वामी शेख जावेद, जगन्नाथ ढेरे, डिगाबर शिंदे, ग्राम पंचायत कर्मचारी व नागरिकांची मोठया संख्येने उपस्थिती होती.

## मोसंबी, द्राक्ष आणि डाळिंबावर उद्या जालन्यात पीक परिसंवाद

### विलास शिंदे करणार मार्गदर्शन

**जालना | प्रतिनिधी -** रानउद्योग प्रोड्यूसर कंपनी व इफको यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार दि. १६ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता जालना येथील मंठा चौफुलीवरील कलश सीड्सच्या सभागृहात मोसंबी द्राक्ष व डाळिंबावर पिक परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक नाशिकच्या सह्याद्री फार्मसचे चेअरमन कथा व्यवस्थापकीय संचालक विलास शिंदे हे काढणी पश्चात साठवण प्रक्रिया व विक्री व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. याशिवाय बदनापूर येथील मोसंबी संशोधन केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. संजय पाटील हे मोसंबी फळबाग व इतर समस्या यावर तर इको चे क्षेत्रीय अधिकारी राहुल भुजाडे हे नॅनो तंत्रज्ञान काळाची गरज या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून माजी मंत्री तथा जालना कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अर्जुनराव खोतकर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी गहिनीनाथ कापसे, जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी व्ही. डी. गायकवाड, जालना जिल्हा फळे व मोसंबी बागायतदार संघाचे अध्यक्ष पांडुरंग डोंगरे यांची उपस्थिती राहणार आहे. या परिसंवादाला फळ उत्पादक शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन रानउद्योग फार्मर प्रोड्यूसर कंपनीचे चेअरमन डॉ. सुयोग कुलकर्णी, सचिव ॲड. भरत मंत्री, इफकोचे योगेश शिंदे यांनी केले आहे.


## माणगाव तालुक्यात परतीच्या पावसाचा कहर

### शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास जमीनध्वस्त;

# जगाचा पोशिंदा बळीराजा चिंताग्रस्त

**बोरघर | माणगाव | प्रतिनिधी -** सद्या परतीच्या पावसाने संपूर्ण माणगाव तालुक्यातील सर्व प्रभागात अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. गुरुवार दिनांक २६ सप्टेंबर पासून सुरू झालेल्या हस्त नक्षत्राने पुढे सलग पंधरा दिवस मेघगर्जनेसह धुवाधार बॅटिंग केली. त्या नंतर गुरुवार दिनांक १० ऑक्टोबर रोजी चित्रा नक्षत्राचा प्रारंभ झाला. त्या दिवसापासून आजपर्यंत परतीच्या पावसाने दररोज अत्यंत दमदार आणि जोरदार तडाखा सुरू ठेवला आहे. त्यामुळे माणगाव तालुक्यातील तयार झालेली आणि हातातोंडाशी आलेला भातशेती रुपी घास जमीन दोस्त झाली आहे त्यामुळे तालुक्यातील शेतकर्यांचे चे प्रचंड मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

दररोज अगदी न चुकता प्रचंड मेघगर्जनेसह धुवाधार तुफान हजेरी लावणारा परतीचा पाऊस आणि विजांचा कडकडाट शेतकर्यांच्या काळजात धडकी भरून बळीराजाला दिवसेंदिवस चिंताग्रस्त करत आहे. कारण त्याच्या प्रचंड मेहनतीने हातातोंडाशी आलेला भातशेती चा घास परतीचा पाऊस त्याच्या पासून ते हिरावून घेण्याचा प्रयत्न करत आहे.



रायगड जिल्ह्याच्या माणगाव तालुक्यातील कैक हजारो हेक्टर जमीन क्षेत्र हे पावसाळी भातशेतीच्या लागवडीखाली अधिग्रहित आहे. भात हे माणगाव तालुक्यातील शेतकर्यांचे प्रमुख पीक आहे. सदर भात पीक हे लागवडीनंतर साधारणतः नव्वद ते १२० दिवसात पुर्णपणे तयार होते. त्यामुळे सद्या संपूर्ण माणगाव तालुक्यातील सदर भात पीक परिपूर्ण अवस्थेत झालेले असताना परतीचा पाऊस सद्या संपूर्ण माणगाव तालुक्यातील विविध विभागात जोरदार स्वरूपात मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट करून पडत आहे. त्यामुळे शेतातील भाताचे ऊभे पीक शेतात साचलेल्या पाण्यात अक्षरशः आडवेतिडवे झाले आहे. त्यामुळे तालुक्यातील शेतकर्यांचे प्रचंड मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शिवाय तालुक्यात दररोज न चुकता पडणार्या परतीच्या पावसामुळे संपूर्ण माणगाव तालुक्यातील भात कापणी पूर्णपणे खोळंबली आहे. तालुक्यात परतीच्या पावसाने भातशेतीच्या केलेल्या सदर नुकसानीचे शासनाने पंचनामे करून आपल्या अन्नदात्या शेतकर्यांना या अस्मानी संकटाने केलेल्या नुकसानी मधून उभारी घेण्यासाठी शासनाने आर्थिक मदत केली पाहिजे.

## भाजपाकडून चंदनझिरा येथील घटनेचा निषेध

**जालना | प्रतिनिधी -** भारतीय जनता पार्टी च्या वतीने जालना येथील चंदनझिरा येथे एका नऊ वर्षाच्या चिमुरडीवर घटनेच्या निषेदार्थ संबंधित आरोपीवर तात्काळ कारवाही करण्यासाठी भाजप जालनाकडून पोलीस अधीक्षक, जालना यांना निवेदन देऊन तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला.

जालना जिल्ह्यातील चंदनझिरा भागात काल रात्री काही नराधमांनी एका नऊ वर्षाच्या चिमुरडीवर अत्याचार करून मारहाण केल्याची घटना मनाला वेदना देणारी आहे. चंदनझिरा प्रकरणातील आरोपींना तात्काळ अटक करून कठोर शिक्षा देण्यात यावी असे निवेदनात म्हटले आहे.

यावेळी भाजपा जालना विधानसभा प्रमुख भास्कर आबा दानवे, जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, महानगराध्यक्ष अशोक पांगारकर, प्रदेश निमंत्रित सदस्य राजेश राऊत, विमल ताई आगलावे, जिल्हा सरचिटणीस सिद्धिविनायक मुळे, सतीश जाधव, संध्याताई देठे, शिवराज जाधव, शुभांगीताई देशपांडे, अरुणाताई जाधव, वसंत जगताप, सुहास मुंडे, सुनील पवार, संजय डोंगरे, सोमनाथ गायकवाड, बद्री भसांडे, दत्ता जाधव, महेश मुळे, कृष्णा गायके, योगेश लहाने, निवृत्ती लंके, बद्री वाघ, छबुराव राठोड, गंभीर पडोळ, अनिल सरकटे, शांतीलाल राऊत, सुनील तरासे, ऋषी आदमने, अरुण वाघुळकर, शिवराम राजपूत, अशोक पारे आदींची उपस्थिती होती.





**१४ ऑक्टोबर १९५६ या या दिवशी बोधिसत्व महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी ५ लाख अनुयायांना बौध्द धम्म म्हणजे अर्थात धम्म दीक्षा दिली. त्यानिमित्ताने आजच्या दिवशी सोमवार (दि १४) रोजी महानगर पालिका जालना शहरातील बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णकृती व अर्धकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी आयु शंकरराव घेवंदे, दिनकर घेवंदे, मननस्वी घेवंदे, सांची मोहोड यांची उपस्थिती होती.**

## सत्ता कोणाची येणार? ठाकरे कि शिंदे

शिवसेनेचा परंपरागत ५८ वा दसरा मेळावा शिवाजी पार्कवर मोठ्या संख्ज्येने आणि नेहमीप्रमाणे जल्लोशात साजरा झाला.शिवाजी पार्कवर आलेले हे सर्व कट्टर शिवसैनिक,मराठी प्रेमी, बाळासाहेबांचे चाहते भक्त,असेच होते. आझाद मैदानावर एकनाथ शिंदे यांनी यांचा दसरा मेळाव्यात आलेले जे लोक होते ते शिंदे मुख्यमंत्री असल्यामुळे त्यांच्या आदेशाने सरकारी कर्मचारी व लाभार्थीच्या खाण्यापिण्याच्या सर्व सोयीयुक्त सरंजाम असल्यामुळे जमले होते. हि त्या लोकांची अगतिकता होती यात शंका नाही.ती गर्दी दाखवण्याची सूज होती,तर शिवाजी पार्कच्या मेळाव्यात शिवसैनिक नेहमीप्रमाणे स्वतःची घरची शिदोरी घेऊन आलेले दिसत होते.दोन्ही मेळाव्यातील हि दोन्ही दृश्य जनतेला काय संदेश देतात ह्याचा लोकशाही प्रेमींनी विचार करून आपल्याला महाराष्ट्राची प्रगती करायची कि अधोगती हे ठरवले पाहिजे.कारण असे कि,उद्धव ठाकरे हे शिवसेनेचे पक्षप्रमुख असून मुख्यमंत्री झाल्यावर ते राज्याचे कुटुंबप्रमुख झाले हे त्यांनी कोरोना काळात माणसांचे जीव कसे वाचतील ह्या बाबत घेतलेल्या निर्णयामुळे आज राज्यातील लाखो कुटुंबातील व्यक्ती जिवंत आहेत हे



सत्य नाकारून चालणार नाही.स्पर्धा अजून संपलेली आणि कारण मी अजून जिंकलो नाही हि वैचारिक प्रवृत्ती दोन्ही मेळाव्यात एकमेकांवर शरसंधान करताना जाणवली.उद्धव ठाकरे यांनी सय्यम ठेवून आपण न बोलता पुन्हा मुख्यमंत्री झाल्यावर काय निर्णय घेणार हे जाहीर करताना सत्ताधारी राजकारणी,सरकारी कर्मचारी,अधिकाऱ्यांनी राज्याचे वाटोळे करणारे,भ्रष्टाचार करून शिंदे सरकारला मदत केली असेल त्यांना तुरुंगात पाठवणार हा कटू निर्णय असला तरी भविष्याचा विचार करता ती काळाची गरज आहे.महाराष्ट्राच्या हिताचा विचार करून मनातले विचार जाहीर बोलून उद्धव ठाकरे यांनी एकप्रकारे चूक केली असे वाटते. शिंदे यांची बुद्धी भ्रष्ट झाली आहे हे त्यांच्या भाषणातील अति आत्मविश्वासाने व आपण भाजपच्या पाठिंब्यावर त्यांच्या ताटाखालचे मांजर झालो आहोत हेच त्यांच्या सराईत खोटे बोलण्याने सिद्ध झाले.शिंदे यांनी आपली सत्ता यावी,आपणच पुन्हा मुख्यमंत्री होणार याच स्वप्नात राहून त्यांनी वारेमाप सरकारी पैशाची उधळण करून मतांची बेगमी करण्याचा कुटील डाव आखला त्यात ते भाजपच्या पाठिंब्याने खरंच यशस्वी होतील काय ? आणि हरियाणा सारखे यशस्वी झालेच तर महाराष्ट्राचा युपी बिहार होणार यात शंका नाही आणि ते राज्याला परवडणारे आहे काय ? मुंबई तुमची आणि भांडी घासा आमची हा प्रयोग सुरु होऊ शकतो.उद्धव ठाकरे यांनी मुंबई महापालिकेची सत्ता राबवताना कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीनंतर त्यांचे आयुष्य सुखासमाधानाचे जावे म्हणून ९२ हजार कोटींची मुदत ठेव राखीव केली होती त्यावर शिंदे सरकाने डल्ला मारला. कर्मचाऱ्यांची ससेहोलपट होणार ह्याचा विचार कर्मचाऱ्यांनी व जनतेने गांभीर्याने केला पाहिजे.जनतेच्या कष्टाचे लाखो कोटी लुटायचे आणि त्यातलेच काही टक्के वाटून मीच जनतेचा कसा कैवारी आहे हा शिंदे यांचा दाखवण्याचा कुटील डाव जनता हणून पाडणार कि नाही हे येणाऱ्या निवडणुकीत दिसून येईल आणि तो प्रसंग येऊ नये म्हणून विरोधी पक्ष कोणती पाऊले उचलणार हेही तितकेच महत्वाचे आहे.महाराष्ट्राची गेलेली प्रतिष्ठा पुन्हा मिळवण्याचा प्रयत्न करणार तर दुसरा असंगाशी संग करून महाराष्ट्राचा युपी बिहार करणार,जनतेने लाचार होऊन जगायचे कि स्वाभिमानाने याची प्रचिती मतदानातून द्यावी लागेल.शिंदे जनतेला मूर्ख समजतात हि त्यांची जमेची बाजू म्हणता येईल.

**यशवंत चव्हाण सीबीडी बेलापूर**

# परतूर शहरासाठी १२ कोटी ३० लक्ष तर मंठा शहरासाठी ०२ कोटी ७० लक्ष रुपयाचा निधी

## माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांची माहिती

**परतूर । प्रतिनिधी -** परतुर विधानसभा मतदारसंघातील परतुर व मंठा शहरातील विकास कामांसाठी माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या प्रयत्नाने वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून १५ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला असल्याची माहिती माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी दिली आहे. पुढे या पत्रकात म्हटले आहे की परतुर व मंठा शहरातील स्वामी समर्थ मंदिरासाठी सभा मंडप देण्याची अनेक दिवसापासून ची मागणी होती ती मागणी पूर्ण झाली असून परतुर येथील सभामंडपासाठी ५० लक्ष तर मंठा येथील सभामंडपासाठी २५ लाख रुपये प्राप्त झाले आहेत

परतूर शहरातील डॉ एपीजे अब्दुल कलाम शादी खाण्याचे अपूर्ण राहिलेले काम पूर्ण करण्यासाठी २५ लाख रुपयांचा निधी प्राप्त झाला काय असल्याचे सांगितले. भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी नाट्यगृह परिसरातील रस्ते बांधकाम व सुशोभीकरणासाठी ०१ कोटी ७५ लक्ष रुपयांचा निधी तर टेलिफोन भवन ते दिंडी मार्ग या रस्त्यासाठी परतूर शहरातील बालाजी मंदिर परिसरातील विकास काम ांसाठी २० लाख रुपयांचा निधी प्राप्त झाले असल्याचे आमदार लोणीकर यांनी म्हटले आहे

मंठा शहरातील मोहन शेठ यांच्या घरापासून तर मच्छिंद्र वाघमारे यांच्या घरापर्यंत ३५ लाख रुपये सिमेंट रस्ता बांधकामासाठी, मंठा तळणी रोड ते म ाऊली मंगल कार्यालय सिमेंट रस्त्यासाठी ३० लाख रुपये, अशा प्रकारचा निधी मंजूर झाला असून पंधरा कोटीतील उर्वरित कामी खालील प्रमाणे परतूर शहरातील अग्निशमन दल ते बस स्थानक ०१ कोटी ५० लक्ष, टेलिफोन भवन दिंडी मार्ग १ कोटी २० लक्ष रुपये, नाट्यगृह परिसराम ध्ये रस्ते बांधकाम व सुशोभीकरणासाठी ०१ कोटी ७५ लक्ष, शादी खाना इमारत २५ लक्ष, परतूर शहरातील स्वामी समर्थ केंद्र येथे सभामंडपासाठी ५० लक्ष, अक्षय कुरकुटे यांच्या घरापासून रामा गवळी यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता ५० लाख रुपये इंदिरा मंगल कार्यालय ते लालबहादूर शास्त्री महाविद्यालय ३० लक्ष संतोष चव्हाण यांचे घर ते अनिल वाशिंबे यांचे घर सिमेंट रस्ता २० लक्ष प्रशांत अग्रवाल यांचे घर ते विलास चव्हाण यांचे घर सिमेंट रस्ता ४० लक्ष रॉंग गल्ली रामेश्वर मंदिर प्रसाद राम गल्ली परतूर येथे रस्ता बांधकाम २० लक्ष माने यांचे घर माने यांचे घर ते छल्लाणी जिनिंग पर्यंत रस्ता बांधकाम ३० लक्ष, जैनुद्दीन यांचे घर ते सुरणार यांचे घर सिमेंट रस्ता २० लक्ष राजू भिसे यांचे घर ते आढे सर यांच्या घरापर्यंत २० लक्ष रस्ता बांधकाम करणे गणपती मंदिर समोर सभा मंडप बांधकाम करणे १० लक्ष रुपये नागोबा नागोबा मंदिर समोर सभा मंडप बांधकाम करण रुपये १० रुपये

परतुर शहरातील कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरातील सुशोभीकरण करणे ७५ लक्ष रुपये सीतानंद पार्क सातवणकर आखाडा रस्ता बांधकाम करणे१० लाख रुपये संतोष चव्हाण यांचे घर ते अनिल वाशिंबे यांचे घर २० लक्ष रुपये प्रशांत अग्रवाल यांचे घर ते विलास चव्हाण यांच्या घरापर्यंत रस्ता बांधकाम करणे ४० लक्ष रुपये यांचे घर ते रामा गवळी यांच्या घरापर्यंत सिमेंट बांधकाम करणे ५० लाख रुपये विशाल यंदे यांचे घर ते बी अँड सी कॉटर पर्यंत रस्ता करणे १० लक्ष रुपये संतोष चव्हाण यांचे घर ते हिदायित खा यांच्या घरापर्यंत रस्ता बांधकाम करणे १५ लक्ष रुपये राम गल्ली येथे राम मंदिर परिसर रस्ता करणे २० लक्ष रुपये धनंजय लिंबुळकर ते दिलीप अण्णा मगर यांच्या घरापर्यंत रस्ता बांधकाम १० सोनू अग्रवाल यांचे घर ते सुनील काळे यांच्या घरापर्यंत रस्ता बांधकाम करणे १० लक्ष रुपये पवार कॉलनी मधील मारुती मंदिर येथे सभा मंडप



बांधकाम करणे १० लाख रुपये पाचारे सर यांचे घर ते विकास खरात यांच्या घरापर्यंत रस्ता बांधकाम १० लक्ष रुपये, बस स्थानक जवळील मारुती मंदिर सभामंडप बांधकाम करणे १० लाख रुपयांसह अन्य कामांचा समावेश आहे.

मंठा शहरातील स्वामी समर्थ मंदिर दिंडोरी प्रणित येथे २५ लक्ष रुपयाचे सभामंडप बांधकाम करणे मोहन शेठ यांचे घर तर मच्छिंद्र वाघमारे यांच्या घरापर्यंत ३५ लक्ष रुपयांचे सिमेंट रस्ता बांधकाम करणे मंठा येथील तळणी मंठा रस्ता रोड ते राजू राठोड यांचे घर योगेश नाईक यांचे घर ते माऊली मंगल कार्यालय पर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करणे ३० लक्ष रुपयांच्या कामांसह इतर कामांना मंजुरी मिळाली असल्याची माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी म्हटले आहे.

### उसतोड कामगारांच्या कष्टाप्रती समृद्धीने व्यक्त केली कृतज्ञता

# सतीश घाटगे यांच्याकडून सपत्नीक सन्मान

**घनसावंगी । प्रतिनिधी -** अंबड, जालना व घनसावंगी तालुक्यातील शेकडो उसतोड कामगारांचा सपत्नीक सत्कार करून त्यांच्या कष्टाप्रती समृद्धी कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे व संचालिका सौ. वैशालीताई घाटगे यांनी कृतज्ञता व्यक्त केली. घनसावंगी शहरातील नृसिंह मंगल कार्यालयात ऊसतोड कामगारांचा हा सन्मान व कृतज्ञता सोहळा सोमवारी मोठ्या उत्साहात पार पडला. उसतोड कामगारांसाठी असा सोहळा जिल्ह्यात पहिल्यांदा राबवण्यात आला.

उसतोडी करणारे कामगारांचे हात ऊस उत्पादक शेतकरी आणि साखर कारखान्याचा खरा कणा आहे. हे कामगार त्यांच्या कुटुंबासाठी खरे हिरो आहेत. या गरीब घटकांचे सामाजिक बाधीलकी म्हणून आम्ही काहीतरी देणे लागतो, या भावनेतून समृद्धी कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमास घनसावंगी विधानसभा क्षेत्रातील उसतोड काम गार मोठ्या संख्यने सहपरिवार उपस्थित होते. त्यांचा सतीश घाटगे व सौ. वैशालीताई घाटगे यांनी सपत्नीक सत्कार केला. महिला भगिनींना साडी व पुरुषांना टॉवेल- टोपी भेट देऊन त्यांचा सन्मान केला, त्यांच्या कष्टाप्रती कृतज्ञता व्यक्त केली. या कामगारांच्या प्रत्येक अडचणीत समृद्धी साखर कारखाना उभा असेल, असा विश्वास यावेळी सतीश घाटगे यांनी कामगारांना दिला. या कार्यक्रमास गोविंद आर्दड, पांडुरंग नाना भांगे, हरीश राठोड, शिवाजीराव कंटूले, रामेश्वर माने, बाबासाहेब हरबक, गणेश खरात यांच्यासह आदी पदाधिकारी उपस्थित होते.




**सन्मानाने उसतोड कामगार भारावले**

उसतोड कामगाराकडे फक्त कामगार म्हणून पाहिलं जात. परंतु सतीश घाटगे यांनी केलेल्या सन्मान सोहळ्यात केलेल्या सत्काराबद्दल प्रत्येक कामगार भारावून गेला. असा मान सन्मान आमचा कधी झाला नाही. माणूस म्हणून आम्हाला मिळालेला हा सन्मान आम्ही कधी विसरणार नाही. अशा शब्दात उसतोड महिलांनी आपल्या भावना व्यक्त करत समृद्धी कारखान्याचे आभार मानले.

उन, वारा, वादळ आणि कडाक्याच्या थंडीत काम करणाऱ्या या कष्टकरी हातामुळे उस उत्पादक शेतकरी आणि समृद्धी साखर कारखाना कष्टकरी गरिबांच्या जीवनात समृद्धी आणत आहे. या कामगारांचे आम्ही देणे लागतो या भावनेतून सर्व उसतोड कामगारांचा सन्मान केला. त्यांच्या पुढच्या पिढीच्या भविष्यासाठी शास्वत प्रकल्प राबविण्याचा प्रयत्न समृद्धी कारखाना करणार असल्याचे समृद्धीचे सतीश घाटगे यांनी सांगितले आहे.

# वाईदेशी कुणबी समाजाला कुणबीचे आरक्षण तात्काळ घोषित करावे - विश्वनाथ पाटील

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यासह मराठवाड्यातील ऊपेक्षित वंचित वाईदेशी कुणबी समाजाला राज्य शासनाने तात्काळ कुणबीचे आरक्षण जाहीर करावे अशी मागणी कुणबी सेनेचे संस्थापक अध्यक्ष विश्वनाथ पाटील यांनी मांडली आहे.



याप्रसंगी मराठवाडा संपर्कप्रम ुख तथा छत्रपती व्हि. के. फाउंडेशन चे अध्यक्ष विष्णू कदम, प्रल्हादराव शिंदे, रामजी सावंत, उद्धवराव सावंत, भगवानराव शिंदे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. मौजे खणेपुरी येथे वाईदेशी कुणबी सम ाजाला कुणबी चे आरक्षण मिळावे यासाठी धरणे आंदोलन कार्यक्रम चालू केला आहे.

कुणबी सेनेच्या वतीने आयोजित केलेल्या धरणे आंदोलनात प्रमुख पदाधिकाऱ्यांनी हजेरी लावून आपले मनोगत व्यक्त केले उपस्थित वाईदेशी कुणबी समाज बांधवांना मार्गदर्शन तसेच काही सूचना सम ाज बांधवांनी यावेळी मांडल्या आहे. दि. १३ ऑक्टोबर २०२४ रोजी श्रीक्षेत्र मौजे खाणेपूर येथे सकाळी दहा वाजल्यापासून समाजबांधवांच्या वतीने धरणे आंदोलन कार्यक्रम चालू करण्यात आलाआहे

या समाजाचे आर्थिक सामाजिक शैक्षणिक मागासले पण राज्य म ागासवर्गीय आयोगाने तीन वेळेस तपासले आहे मात्र अद्याप पर्यंत राज्य मागासवर्ग आयोगाने या सम ाजाचा अहवाल राज्य शासनाकडे पाठवला नाही तो अहवाल तात्काळ पाठविण्यात यावा सदरील अहवाल शासनाकडे तात्काळ पाठविण्यात यावा, यासाठी राज्य शासनाने संबंधितांना सूचना द्याव्यात आणि राज्य शासनाने तो अहवाल स्वीकारून तात्काळ वाईदेशी कुणबी समाजाला कुणबी चे आरक्षण घोषित करावे अशी मागणी या वेळीकरण्यात आली.

कुणबी सेना च्या मागणीचा राज्य शासन व विरोधी पक्षातील नेत्यांना य् विचार करावा रस्ता कुणबी समाज येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीत धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही असे प्रतिपादन विश्वनाथ पाटील यांनी यावेळी केले आहे.

यावेळी व्यासपीठावर कुणबी सेनेचे संस्थापक अध्यक्ष विश्वनाथ पाटील,मराठवाडा संपर्क प्रमुख विष्णू कदम, प्रल्हादराव शिंदे कुणबी सेना पालघर, मान्यवर समाजातील प्रमुख पदाधिकारी, उपोषण करते जनाबापू गायकवाड, भगवानराव शिंदे,नामदेव काळे, गणपतराव जाधव, भागवत काळे, सुभाष बिटले, बाबुराव शिंदे, दत्तात्रय टापरे खनेपुरी येथील ग्राम स्थ,पंचक्रोशीतील, तालुक्यातील आणि जिल्ह्यातील वाईदेशी कुणबी समाज बांधव मोठ्या संख्येने यावेळी या धरणे आंदोलनात सहभागी झाला होता.

### ज्ञानराधा मल्टिस्टेट फसवणूक प्रकरण

# ईडीची मोठी कारवाई; एक हजार कोटी रुपये गोठवले

## आमदार रोहित पवार यांचा पाठपुरावा

**कर्जत । प्रतिनिधी -** कर्जत-जामखेड मतदारसंघातील हजारो गुंतवणूकदारांनी कष्टाचे पैसे ज्ञानराधा मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटीमध्ये गुंतवले होते, परंतु संस्थेने ही रक्कम परत न करता गुंतवणूकदारांची फसवणूक केली. त्यामुळे अनेक गुंतवणूकदार आर्थिक संकटात सापडले. हा प्रकार उघड झाल्यानंतर गुंतवणूकदारांनी फसवणुकीची तक्रार केली. या संपूर्ण प्रकरणात तातडीने लक्ष घालत आमदार रोहित पवार यांनी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन या प्रकरणी तातडीने योग्य ती पावले टाकून कर्जत जामखेड मतदारसंघासह राज्यभरातील सामान्य गुंतवणूकदारांना न्याय मिळवून देण्याची मागणी केली होती. आमदार पवार यांनी या प्रकरणी सातत्याने पाठपुरावा केला आणि अखेर त्यांच्या म ागणीची यंत्रणेने दखल घेतली आणि ईडीने तातडीने कारवाई करत ज्ञानराधा मल्टिस्टेट सोसायटीच्या कार्यालयांवर छापे टाकले आणि १ हजार कोटी रुपये गोठवले.

> माझ्या मतदारसंघातील कर्जत आणि जामखेड या दोन्ही ठिकाणच्या हजारो गुंतवणूकदारानी आपले कष्टाचे पैसे या संस्थेमध्ये टाकले परंतु या संस्थेने या सर्व गुंतवणूकदाराची फसवणूक केली असून त्यांना न्याय मिळणे आवश्यक होतं. याबाबत केलेल्या पाठवपुराव्याला यश आलं आणि संस्थेवर कारवाई झाली याचं समाधान असल्याची प्रतिक्रिया आ. रोहीत पवार यांनी माध्यमांशी बोलतांना दिली आहे. परंतु, जो पर्यंत हे पैसे गुंतवणूकदारांना परत मिळत नाहीत तोपर्यंत न्याय मिळाला असे म्हणता येणार नाही, त्यादृष्टीने शासनाने तातडीने पाऊले उचलावीत अशी मागणीही आ. पवार यांनी केली.

ही कारवाई राज्यभरातील लाखो गुंतवणूकदारांसाठी मोठा दिलासा ठरली आहे. यासंदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी मतदारसंघात गुंतवणूकदारांसोबत आंदोलन सुरू केले होते आणि हे प्रकरण तालुका स्थरावर न ठेवता पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करावे अशी मागणी केली होती आणि आता याबाबत आर्थिक गुन्हे शाखेकडेही पाठपुरावा सुरू आहे. यासंदर्भात या सर्व बँकांवर ज्या बँकेचे नियंत्रण असते त्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया कडे देखील आमदार रोहित पवार यांनी रीतसर तक्रार केली असून त्याचा पाठपुरावा सुरू आहे.

ईडीच्या या कारवाईमुळे गुंतवणूकदारांना दिलासा मि ळाला असला तरी अजूनही त्यांना त्यांच्या हक्काच्या पैशाची प्रतीक्षा आहे. सरकारने आता तातडीने यासाठी ठोस योजना आखावी आणि गुंतवणूकदारांचा विश्वास परत मिळवावा, अशी भावना नागरिक व्यक्त करत आहेत. या प्रकरणात आमदार रोहित पवार यांनी दाखवलेली तत्परता आणि संवेदनशीलता मोलाची ठरली असून भविष्यात असे प्रकार टाळण्यासाठी कडक धोरणांची आवश्यकता असल्याचे जाणकारांचे मत आहे.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.